राज्यात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे शेतीपिके व फळपिकांच्या नुकसानीसाठी आपदग्रस्तांना मदत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सीएलएस-२०१८/प्र.क्र.४६/म-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०३ मार्च, २०१८

वाचा :- शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१५/प्र.क्र.४०/म-३, दि. १३ मे, २०१५

प्रस्तावना :-

राज्यात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये राज्यातील एकूण १९ जिल्हयामध्ये गारपीट व झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकाचे व फळपिकांचे नुकसान झाले असल्याचे आढळून आले आहे. महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दि. १३ मे, २०१५ शासन निर्णयान्वये ठरविण्यात आलेल्या SDRF च्या निकषानुसार व दरानुसार शेतीपिके व फळपिकांच्या नुकसानीसाठी आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये राज्यातील १९ जिल्हयामध्ये झालेल्या गारपीट व अवेळी पावसामुळे शेती पिकाचे व फळपिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना संदर्भाधीन शासन निर्णयात विहित केलेल्या दराने मदतीचे वाटप करण्यासाठी या शासन निर्णया सोबत जोडलेल्या " परिशिष्ट-अ " प्रमाणे निधी वितरित करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. शेतपिकाचे व फळपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करतांना खालील अटी व शर्तीच्या पुर्ततेची खात्री करण्यात यावी :

१) प्रचलित नियमानुसार शेतीपिकांचे व बहुवार्षिक फळपिकांच्या ३३ % अथवा त्याहून अधिक नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत मदत अनुज्ञेय राहील. सदर मदत संदर्भाधीन शासन निर्णयानुसार विहित केलेल्या दराने वाटप करण्यात यावी.

२) शेती व फळपिकांच्या ३३ % पेक्षा अधिक नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करणे आवश्यक राहील.

३) नुकसानी संदर्भात संयुक्त स्वाक्षरीने पुर्ण करण्यात आलेल्या पंचनाम्यानुसार मदतीचे वाटप जिल्हाधिकारी यांनी करावे.

४) आपदग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानीकरिता द्यावयाची मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात यावी. याप्रमाणे जमा करण्यात येणाऱ्या रकमेतून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसूली करण्यात येऊ नये. कोणत्याही बाधितांना रोखीने किंवा निविष्ठा स्वरुपात मदत देण्यात येऊ नये.

५) सोबत जोडलेल्या परिशिष्टातील १९ जिल्हयांच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत खातरजमा करुन रक्कम बाधित शेतकऱ्यांना वितरित करण्यात यावी.

३. वरील प्रयोजनासाठी मदत वाटप करण्यासाठी होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा:

मागणी क्रमांक सी-६
२२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य
०२, पूर, चक्रीवादळे इ.
१०१, अनुग्रह सहाय्य
(९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च,
(९१)(०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४५२)
३१, सहाय्यक अनुदाने (अनिवार्य)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३१५५४१२१२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Ramchandra Bagane

Digitally signed by Dilip Ramchandra Bagane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d9bdeba4f5b208a7811899a0f4522d8086dc2e6e2655bea26b70db55378254d2, serialNumber=a4ff332f80ce4e5a25f28d86597d7ac1c7ca6c95d9241be4eb51488570f63a29, cn=Dilip Ramchandra Bagane
Date: 2018.03.03 15:34:18 +05'30'

(दि.रा. बागणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
२. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
४. विभागीय आयुक्त (नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
५. संबंधित जिल्हाधिकारी,
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
८. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
११. सह सचिव व वित्तीय सल्लागार (कार्यासन म-११), मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई,
१२. अवर सचिव/कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प-६/व्यय-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अवर सचिव/कार्यासन अधिकारी (१०-अे/१३-अे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१५. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१६. निवड नस्ती (कार्यासन म-३).

शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक : सीएलएस-२०१८/प्र.क्र.४६/म-३
दिनांक ०३ मार्च, २०१८ चे " परिशिष्ट-अ "

अ.क्र.	विभाग	जिल्हा	बाधित जिरायत क्षेत्र (हे.)	बाधित बागायत क्षेत्र (हे.)	बाधित बहुवार्षिक पिकांचे क्षेत्र (हे.)	आवश्यक मदतीची रक्कम (रू.लाखात)
१	नाशिक	जळगांव	०.००	७१६.४६	०.००	९६.७२
एकूण नाशिक			०.००	७१६.४६	०.००	९६.७२
२	औरंगाबाद	जालना	८५७७.९७	१०२०१.६७	२८९९.७९	२४८२.५०
३		परभणी	४९१५३.११	१५५०७.००	२२०३.६०	५८३२.५१
४		हिंगोली	३९३२.१९	१४२७.२८	४०.८०	४६७.४१
५		नांदेड	१८५२२.५१	३९०५.४४	४५२.०५	१८६८.१४
६		बीड	२९६७.९८	११७६.४४	२५८.५१	४०७.१८
७		लातूर	१७१४५.७७	२९७०.२९	४२७.९५	१६४३.९३
८		उस्मानाबाद	५४३१.७९	५.४०	०.००	३७०.०९
एकूण औरंगाबाद			१०५७३१.३२	३५१९३.५२	६२८२.७	१३०७१.७८
९	अमरावती	अमरावती	१७६६७.०८	९५५९.४८	२११५१.०७	६३५३.०१
१०		अकोला	८५०.७०	४६३.७२	५६६.३७	२२२.१७
११		यवतमाळ	१६०९.५०	९१७२.३४	३०९.१०	१४०३.३१
१२		बुलढाणा	३५४६.३९	२८२९७.८८	२२४९.४०	४४६६.२६
१३		वाशिम	१५७९७.९८	२३५२.८८	६९१.९९	१५१८.७७
एकूण अमरावती			३९४७१.६५	५०२४६.३०	२४९६७.९३	१३९६३.५२
१४	नागपूर	नागपूर	१६९.६९	१०२३८.५७	६३७७.८५	२५४१.७६
१५		वर्धा	६.२०	३२१५.४४	४०९.९४	५०८.२९
१६		भंडारा	६९६.००	६०३.६०	०.४०	१२८.८८
१७		गोंदिया	१०५७.१८	४६५०.८०	७.८०	७०१.१५
१८		चंद्रपूर	१३५७.१०	१८२८.१८	०.२५	३३९.१४
१९		गडचिरोली	१४.७४	४७.३६	०.००	७.३९
एकूण नागपूर			३३००.९१	२०५८३.९५	६७९६.२४	४२२६.६१
एकूण राज्य			**१४८५०३.८८**	**१०६७४०.२३**	**३८०४६.८७**	**३१३५८.६३**